मे २०२४/पाने ६०/किंमत ₹१०

# लोकराज्य



## राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती वर्ष

(३१ मे १७२५ – १३ ऑगस्ट १७९५)

T.S.S's Smt. V.U. Patil Arts and Late Dr. B.S. Desale Science College
Sakri (Dhule)

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

वर्ष ७५ वे | अंक ५ | मे २०२४

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

**लोकराज्य**


| | |
|---|---|
| मुख्य संपादक | ब्रिजेश सिंह |
| प्रबंध संपादक | हेमराज बागुल |
| | डॉ. राहुल तिडके |
| संपादक | दयानंद कांबळे |
| सहसंपादक | अश्विनी पुजारी |
| | पवन राठोड |
| | गजानन पाटील |
| मुखपृष्ठ | सीमा रनाळकर |
| | सुशिम कांबळे |
| मांडणी, सजावट | शैलेश कदम |
| मुद्रितशोधन | भाग्यश्री पेठकर |
| मुद्रण | मे. क्वार्टरफोल्ड प्रिंटेबिलिटीज, तळोजा एमआयडीसी, नवी मुंबई. |


माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमत असेलच असे नाही.

# देशातील सर्वोत्तम संचालनालय होण्याचा बहुमान

एनसीसीमध्ये विद्यार्थ्यांवर देशभक्ती, शिस्त व समाजसेवेचे संस्कार घडतात. सर्वांकरिता एनसीसी प्रशिक्षण अनिवार्य झाले, तर ती खरोखरच चांगली गोष्ट होईल, असे प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी केले.

राष्ट्रीय छात्र सेनेच्या (एनसीसी) महाराष्ट्र संचालनालयाला 'सर्वोत्कृष्ट संचालनालय' ठरल्याबद्दल राज्यपाल बैस यांच्या हस्ते राजभवन येथे 'राज्यपालांचे प्रशस्तिपत्र' समारंभपूर्वक प्रदान करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. राजभवनातील दरबार हॉल येथे झालेल्या 'प्रशस्तिपत्र प्रदान सोहळ्यात' राज्यपालांच्या हस्ते महाराष्ट्र एनसीसी संचालनालयाचे अतिरिक्त महासंचालक मेजर जनरल योगेंदर सिंह यांना प्रशस्तिपत्र देण्यात आले.



आपण स्वतः एनसीसी कॅडेट होतो, असे नमूद करून देशातील शाळा; तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये शिस्तीचे महत्त्व बाणवले, तर देश अतिशय वेगाने प्रगती करेल, असे राज्यपालांनी सांगितले.

महाराष्ट्र एनसीसी संचालनालयाने आजपर्यंत २३ वेळा प्रधानमंत्र्यांचे ध्वजनिशाण जिंकले; तसेच आठ वेळा महाराष्ट्र संचालनालय उपविजेते ठरले आहे. याबद्दल राज्यपालांनी राज्यातील एनसीसीच्या सर्व अधिकारी व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये एनसीसी कार्यरत असून एकूण १.१७ लाख कॅडेट्स कार्यरत आहेत. पुढील १० वर्षांत कॅडेट्सची राज्यातील संख्या १.८५ लाख इतकी वाढवली जाणार आहे, हे कौतुकास्पद आहे. एनसीसी प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी निवडलेल्या क्षेत्रात काम करताना राष्ट्रहिताला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे आवाहन राज्यपालांनी विद्यार्थ्यांना केले.

या सोहळ्याला भारतीय सैन्य दलातील वरिष्ठ अधिकारी, शासनाचे अधिकारी, विद्यापीठांचे कुलगुरू; तसेच विविध महाविद्यालयांमधील एनसीसीचे कॅडेट्स उपस्थित होते. यावेळी एनसीसीच्या चमूने सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला.

T.S.S's Smt. V. U. Patil Arts and Late Dr. B. S. Desale Science College, Sakri (Dhule)

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule

आपल्या देशाला समाजसुधारणेची मोठी परंपरा लाभली आहे. समाजसुधारणेच्या चळवळीत महाराष्ट्र राज्य हे नेहमीच अग्रेसर राहिले आहे. महात्मा जोतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गोपाळ गणेश आगरकर, महर्षी कर्वे अशी समाजसुधारकांची मोठी परंपरा आपल्याकडे आहे. परंतु देशात राजेशाही पद्धती असताना काळाच्या पुढे जाऊन विचार करणे आणि त्याप्रमाणे कृती करणे हे निश्चितच धाडसाचे आणि पुरोगामी पाऊल आहे असे म्हटले पाहिजे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनीदेखील अशाच प्रकारे काळाच्या पुढे जाऊन हिंदू समाजात सुधारणा करण्याचा प्रयत्न केला, ते आजही अनुकरणीय आहे.

# सामाजिक परिवर्तन

**प्रा. डॉ. विजय देसले**

राजा राममोहन रॉय यांनी क्रांतिकारक पाऊल उचलले. सतीची पद्धत कायद्याने बंद करावी, यासाठी अभ्यासपूर्ण दोन पुस्तिका लिहिल्या आणि अथक प्रयत्न केले. तसेच कायद्याचे स्वरूप ठरवण्यासाठी तत्कालीन गव्हर्नर-जनरल विल्यम बेंटिंक याच्याबरोबर चर्चा केली. परिणामतः लॉर्ड विल्यम बेंटिंकने ४ डिसेंबर १८२९ रोजी सती-बंदीचा कायदा केला आणि सती जाणे हा फौजदारी गुन्हा म्हणून घोषित करण्यात आला.

## युगानुकूल परिवर्तन

पती मृत्यू पावल्यानंतर त्यांच्या कलेवरासह आत्मदहन करणे याला सती जाणे असे म्हणतात. भारताप्रमाणे सतीची पद्धत युरोपात आणि अति पूर्वेकडील देशातही प्रचलित होती. भारतात राजस्थान, बंगाल, पंजाब या राज्यात ही पद्धती होती. महाराष्ट्रातील अनेक मराठा सरदार घराण्यात ही पद्धती होती आणि होळकर घराणेही त्याला अपवाद नव्हते.

अहिल्यादेवी होळकर यांनी त्यांच्या कार्यकाळात या सतीच्या पद्धतीला वारंवार विरोध केला. ही गोष्ट खूप महत्त्वाची आहे. त्या काळच्या रूढीवादी वातावरणात त्यांच्या मुलीच्या म्हणजे मुक्ताच्या लग्नाचा पण लावणे ही किती धाडसाची गोष्ट होती. जो लुटारूंचा बंदोबस्त करेल त्याच्याशी कन्या मुक्ता हिचे लग्न होईल. या मागे प्रजेच्या सुरक्षेचा विचार होता. त्याकाळी यात्रेकरू, प्रवासी यांची लूट होत असे. प्रवासात दगाफटका होई. चोऱ्या होत. हे सारे लुटारू करत असत. अहिल्यादेवींनी प्रजेसाठी आपल्या मुलीच्या सुखाचाही विचार केला नाही आणि ज्या काळात आठव्या वर्षी मुलीचे लग्न केले जाई, त्या काळात मुक्ता १८ वर्षांची झाली तरीही लोकांची टीका सहन करीत अहिल्यादेवी वाट पाहत होत्या. अखेर यशवंतराव फणसे या वीराने हा पण पूर्ण केला आणि १८व्या वर्षी मुक्ताचा विवाह झाला.

अहिल्यादेवी म्हणत, ज्या रूढी अंधाराकडून उजेडाकडे नेतात त्या रूढी आम्हाला मान्य आहेत. उजेडाकडून अंधाराकडे नेणाऱ्या रूढींना आम्ही अंधश्रद्धा म्हणतो. तशा रूढी पाळताना प्रत्येकाने विचार करावा. मुक्ताचं लग्न रूढी मोडून ठरलं आणि रूढी मोडूनच झालं.

आजच्या काळातही हुंडापद्धतीमुळे मुलींचा होणारा छळ आपण बघत किंवा वाचत असतो. पण त्याकाळी अहिल्यादेवी होळकर यांनी त्यांच्या राज्यात हुंडाबंदी केली होती. हुंडा देणारा, घेणारा आणि मध्यस्त या सर्वांना दंड ठोठावण्याची तरतूद त्यांनी केली होती, हिंदू समाजात युगानुकूल परिवर्तन घडवण्याचा प्रयत्न त्यांनी केला, त्यामुळे हिंदू समाजात मोठे प्रबोधन होण्यास मदत झाली.

आज काही लोक मध्ययुगीन आणि वाळवंटी मानसिकतेत स्त्रियांना कोंबू पाहतात, विशिष्ट वेशभूषा ही शिक्षणापेक्षाही महत्त्वाची ठरते आणि त्यासाठी आंदोलने होतात, त्या पार्श्वभूमीवर विचार केल्यास अहिल्यादेवींनी त्या काळात केलेल्या सामाजिक परिवर्तनाचे महत्त्व लक्षात येते.

## एक सुवर्ण अध्याय

विधवा स्त्रियांना त्यांच्या इच्छेप्रमाणे दत्तक घेण्याचा हक्क देणे हे देखील त्यांच्या काळाच्या पुढे असणाऱ्या दृष्टीचे उदाहरण आहे. एका सावकाराच्या विधवा पत्नीला महिन्याचा कालावधी लोटला तरी दत्तक घेण्याची परवानगी मिळत नव्हती. कारण कमाविसदार या कामासाठी लाच मागत असल्याचे अहिल्यादेवींच्या लक्षात आले. त्यांनी कमावीसदारास दंड ठोठावला आणि विधवेस दत्तकाची परवानगी दिली. २५० वर्षांपूर्वी भारतीय समाजात स्त्रियांचे स्थान बघता अहिल्यादेवींचे कर्तृत्व लक्षात येते. त्यांनी केलेल्या सामाजिक सुधारणा आजही आपल्याल्या थक्क करतात.

अहिल्यादेवींची कारकिर्द ही भारताच्या इतिहासातील एक सुवर्ण अध्याय आहे. अहिल्यादेवी हे जसे धार्मिकता, लोककल्याण आणि न्यायाचे प्रतीक आहे, त्याप्रमाणे त्या सामाजिक परिवर्तनाचेही प्रतीक आहेत.

(लेखक हे विमलताई उत्तमराव पाटील महाविद्यालय, साक्री येथे प्राध्यापक आहेत.)



TSS's Smt. V. U. Patil Arts and Late Dr. B. S. Desale Science College Sakri (Dhule)
PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule